# कार्यालय,नागपूर महानगरपालिका,नागपूर

सामान्य प्रशासन विभाग

१ ला मजला,नविन प्रशासकिय इमारत, महानगरपालिका मार्ग,

सिव्हील लाईन,नागपूर-४४०००१

दुरध्वनी क्र- ०७१२-२५६७०३२/१८३ (ईमेल gadnmcnagpur@gmail.com)


75 आज़ादी का अमृत महोत्सव

G20

पत्र क्र. : - साप्रवि/वि.स.ता/ 27 /२०२३ दिनांक :-२२ /११/२०२३

**विधानमंडळ कामकाज/ कालमर्यादा /अति-तातडीचे**

प्रति,

मा.प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी
अग्निशमन विभाग
महानगरपालिका नागपूर.

विषय :- **विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ७२७१२.**
**"नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमान वर्धमाननगरातिल अगरबत्तीचा कारखाना सायकल आणि फोमच्या गोदामांना लागलेली भीषण आग".**

संदर्भ :-मा.कक्ष अधिकारी नगर विकास विभाग,महाराष्ट्र शाषन यांचे पत्र क्र.विसताप्र-१७२३/प्र.क्र.२१८/नवि-२६ २० दिनांक.२१/११/२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विधानसभा तारांकित प्रश्न ७२७१२ , मा. श्री. मोहन मते मा. विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेआहे. ठरावाच्या अनुषंगाने आपल्या विभागाशी संबंधित मुद्दा असल्यामुळे पाठविण्यात येत आहे. करीता स्वयंस्पष्ट अहवाल, पुरक टिप्पणीसह मुद्देनिहाय ud२०.urban-mh@mah.gov.in व vidya.hampayy@nic.in शासनाच्या संकेतस्थळावर पाठवण्यात यावी, तसेच पाठवण्यात येणाऱ्या उत्तराची एक प्रत gadnmcnagpur@gmail.com या ईमेलवर प्रत सुलभ माहितीसाठी या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे.

O/C

सहपत्र :- संदर्भिय पत्र

23/11/2023

सहाय्यक अधिक्षक
सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

प्रतिलीपी :-

१) मा. उपायुक्त, साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२) मा. सहा. आयुक्त साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दुरध्वनी क्र.- २२७९४२०६
Email ID :- ud26.urban-mh@mah.gov.in
मो.नं. ९८७०२४७०२४, ७७३८१९३२९१
vidya.hampayya@nic.in

---

क्रमांक :- विसताप्र-१७२३/प्र.क्र.२१८/नवि-२६ दिनांक :-२०/११/२०२३

प्रति,

आयुक्त,
नागपूर महानगरपालिका,
नागपूर

विषय:-विधानसभा तारांकित प्रश्न क्र.७२७१२
"नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमाननगरातिल अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमच्या गोदामांना लागलेली भीषण आग."

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत श्री. मोहन मते मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या तारांकित वस्तुस्थिती प्रश्नाची प्रत सोबत जोडली आहे. यानुषंगाने सविस्तर पूरक टिप्पणी व आवश्यक त्या कागदपत्रांसह आपला स्वयंस्पष्ट अहवाल PDF Format व Word File (Sakal Marathi) मध्ये शासनास ud२६.urban-mh@mah.gov.in व vidya.hampayya@nic.in या Email-Id वर तात्काळ पाठविण्यात यावा, ही विनंती.

आपली,

(प्रियंका चौधरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत: वरील प्रमाणे

क्रमांक - ______ / ब-१

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई/नागपूर

दिनांक : १६-११-२०२३

प्रेषक:

सचिव-१ (कार्यभार),

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

**उप सचिव**

**नगर विकास विभाग**

महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक - ७२७१२**

महोदय,

**उपरिनिर्दिष्ट प्रश्नाबाबतची वस्तुस्थिती** या सचिवायलास **त्वरीत दोन दिवसात कळवावी** अशी विनंती आहे.

सदरहू प्रश्न स्वीकृत करण्यासारख्या आहे की नाही हे ठरविण्यासाठी ही माहिती आवश्यक असून ती हे पत्र मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत या सचिवालयास कळवावी. उक्त अवधीत आपणाकडून माहिती न आल्यास, प्रश्न स्वीकृत होऊन तो शासनाकडे उत्तरासाठी पाठविला जाण्याची शक्यता आहे

सदरहू प्रश्न स्वीकृत झाल्यास, तो दिनांक १२-१२-२०२३ रोजी उत्तरासाठी ठेवण्यात येईल.

आपला

कक्ष अधिकारी,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

---

**विषय - नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमाननगरातिल अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमच्या गोदामांना लागलेली भीषण आग**

**श्री. मोहन मते (नागपूर दक्षिण)**

**सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमाननगरात लागलेल्या भीषण आगीत अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमचे गोदाम जळून खाक झाले असल्याची घटना दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आगीची झळ लगतच्या निवासी वस्त्यांना सोसावी लागली असल्याने व्यापारी पेठेलगतच्या रहिवाश्यांत भीतीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, नागपूर शहरातील बहुतांश व्यापारी पेठेतील दुकाने आणि गोदामांत अग्निसुरक्षा निकषांचे पालन केले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशाप्रकारे नागपूर शहरातील दुकाने आणि गोदामांच्या आगीच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

**अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, महानगरपालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर

(फोन नं. ०७१२-२५६२३१६) email-dfo.nmcngr@gov.in


क्र. NMC/FIRE/OWL/२०२३-२४/ 3061 दिनांक 30/11/2023

प्रति,

मा. उप सचिव,
नगर विकास विभाग – २६ महाराष्ट्र शासन,
४ था मजला, मुख्य इमारत हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय मुंबई- ४०००३२

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ७२७१२.
"नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमाननगरातील अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमच्या गोदामांना लागलेली भीषण आग."

संदर्भ:- विसताप्र-१७२३/प्र.क्र.२१८/नवि-२६/दिनांक २०/११/२०२३ अन्वये.

महोदय,

संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, मा. श्री. मोहन मते विधान सभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्न् क्र. ७२७१२ नुसार मुद्येनिहाय माहिती तयार करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग महानगरपालिका नागपूर यांच्यामार्फत "नागपूर शहरातीलकळमना आणि वर्धमाननगरातील अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमच्या गोदामांना लागलेली भीषण आग." यासंबंधी यथास्थिती अहवाल टिपणीसह संलग्न करून सादर करण्यात येत आहे.

अति. आयुक्त (सामान्य)
महानगरपालिका नागपूर

| | |
|---|---|
| संबंधीत अधिकारीचे नाव | : बी.पी.चंदनखेडे |
| पदनाम | : प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| दुरध्वनी क्रं | : ०७१२-२५६१५८४ |
| मोबाईल क्रं. | : ९९२३७५१४०२ |

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, महानगरपालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर

(फोन नं. ०७१२-२५६२३१६) email-dfo.nmcngr@gov.in


क्र. NMC/FIRE/OWL/२०२३-२४/ दिनांक

प्रति,

मा. उप सचिव,
नगर विकास विभाग – २६ महाराष्ट्र शासन,
४ था मजला, मुख्य इमारत हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय मुंबई- ४०००३२

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ७२७१२.
"नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमाननगरातील अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमच्या गोदामांना लागलेली भीषण आग."

संदर्भ:- विसताप्र-१७२३/प्र.क्र.२१८/नवि-२६/दिनांक २०/११/२०२३ अन्वये.

महोदय,

संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, मा. श्री. मोहन मते विधान सभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्न् क्र. ७२७१२ नुसार खालील प्रमाणे मुद्येनिहाय माहिती तयार करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विचारण्यात आलेले प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमाननगरात लागलेल्या भीषण आगीत अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमचे गोदाम जळुन खाक झाले असल्याची घटना दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय, | हे खरे आहे. परंतु, सदर आगीच्या घटना दि. ०६/१०/२०२३ रोजी घडलेल्या आहे. |
| २ | असल्यास, सदरहू आगीची झळ लगतच्या निवासी वस्त्यांना सोसावी लागली असल्याने व्यापारी पेठेलगतच्या रहिवाश्यांत भितीचे वातावरण पसरले आहे, हे हि खरे आहे काय ; | हे खरे आहे. सदर आगीची झळ लगतच्या रहवाशी इमारतीला लागलेली होती. त्यामुळे भितीचे वातावरण पसरले होते. |
| ३ | असल्यास, नागपूर शहरातील बहुतांश व्यापारी पेठेतील दुकाने आणि गोदामांत अग्निसुरक्षा निकषांचे पालन केले जात नाही, हे हि खरे आहे काय, | नागपूर शहरातील व्यापारी क्षेत्रात येत असलेल्या बाजारपेठेतील बहुतांश: दुकानाचे बांधकाम क्षेत्रफळ किंवा चटई क्षेत्रफळ आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारीत अधिनियम २०२३ चे अनुसुची I मधील वाणिज्यिक इमारतीच्या वापरानुसार अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागामार्फत अग्निसुरक्षा उपाययोजनाची |

| | | |
|---|---|---|
| | | व्यवस्था करण्यास व्यावसायीक किंवा भोगवटदा यांचे विरुध्द आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारीत अधिनियम २०२३ अन्वये कारवाई करण्यात येते.<br>त्याअनुषंगाने शहरात अस्तित्वात तथा वापरात असलेल्या विविध प्रकारच्या इमारतीमध्ये ज्यांनी अधिनियमाच्या तरतुदीनुसार किमान अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता केलेली नाही अश्या एकूण १८४८ विविध प्रकारच्या इमारतीवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारीत अधिनियम २०२३ च्या विविध कलमाअंतर्गत कारवाई करण्यात आली असून निरंतर कारवाई करणे सुरुच आहे. |
| ४ | असल्यास, अशाप्रकारे नागपूर शहरातील दुकाने आणि गोदामांच्या आगीच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत, | अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागामार्फत शहरामध्ये अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता न करणा-या विविध प्रकारच्या इमारती व व्यवसायीक प्रतिष्ठाने यांच्या विरुध्द आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारीत अधिनियम २०२३ च्या विविध कलमाअंतर्गत निरंतर कारवाई करण्यात येत आहे. |
| ५ | नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत? | निरंक |

बी. पी. चंदनखेडे

प्र. मुख्य् अग्निशमन अधिकारी

म.न.पा. नागपूर

## -:टिपणी:-

महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.७२७१२ प्रमाणे मा. श्री. मोहन मते व इतर विधान परिषद सदस्य यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्नाबाबत टिपणी :-

१. नागपूर शहरात विविध प्रकारच्या रहवासी, वाणिज्यिक, रुग्नालय, शैक्षणिक, व्यवसायीक व इतर इमारती अस्तीत्वात असुन राज्यात आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनिय २००६ हा कायदा ०८ डिसेंबर २००८ मध्ये व सुधारीत अधिनियम २०२३ अस्तित्वात आलेला आहे. महानगरपालिका सिमे अंतर्गत बहुतांश गोदाम व कारखाने अग्निशमन कायदा अंमलात येण्यापूर्वीच अस्तीत्वात आलेल्या आहेत.

२. गोदाम व कारखाने यांना व्यवसायाकरीता मा. उपसंचालक, औद्योगीक सुरक्षा व आरोग्य् संचालनालय, उद्योग भवन, यांच्या मार्फत परवाने देण्यात येतात. नागपूर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम परवानगी व अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र नसलेल्या गोदाम व कारखान्याकरीता परवाना नुतनीकरण करण्यात येवु नये याबाबत तात्कालीन मा. आयुक्त्, नागपूर महानगरपालिका यांनी दिनांक ३१/०३/२०१८ रोजी पत्राद्वारे कळविले आहे.

३. अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागात ०९ अग्निशमन केंद्र कार्यरत असुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षक उपाययोजना अधिनिय २००६ व सुधारीत अधिनियम २०२३ मधील विविध तरतुदीचे उल्लंघन करीत असलेल्या शहरातील गोदाम व कारखाने धारक यांचे विरुध्द कार्यवाही करण्यास अग्निशमन विभागात एकच नामनिर्देशीत अधिकारी उपलब्ध आहे.

४. अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातर्फे महानगरपालिका हद्दीतील नविन व जुन्या विविध प्रकारच्या इमारती विरुध्द महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षक उपाययोजना अधिनियमाचे कलम ६ अंतर्गत अपार्यप्तता तथा उल्लंघनाबाबत एकूण १८४८ इमारती विरुध्द नोटिस तामील करण्यात आले. त्यापैकी अधिनियमाचे कलम ८(१) अंतर्गत धोकादायक इमारतीतून दुर निघून जाण्याबाबत एकूण १२८६ इमारती विरुध्द नोटिस तामील करण्यात आले व त्यापेकी अधिनियमांचे कलम ८(२) क नुसार एकूण ८२१ इमारती विरुध्द विद्युत व पाणी खंडीत करण्याबात संबंधित प्राधिकरणाला निर्देश दिले आहे. व अधिनियमांचे कलम ८(२) ख अंतर्गत एकूण १६२ इमारतीतुन / तीच्या भागातुन व्यक्तींना हलविण्याबाबत व अधिनियमाचे कलम ३६ अंतर्गत एकूण १२२ इमारतीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत संबंधित पोलिस विभागाला कळविले आहे. तसेच अधिनियमाचे कलम ४० अंतर्गत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात ०५ प्रकरणात खटला दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावित असुन अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागामार्फत अधिनियमाचे विविध कलमानुसार शहरातील विविध इमारती विरुध्द निरंतर कार्यवाही करण्यात येत आहे.

बी.पी.चंदनखेडे
प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
म.न.पा. नागपूर

1

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

अश्विन मुद्गल
भा.प्र.से.
आयुक्त

कार्या. : 0712 – 2567001
घर : 0712 – 2567057
फॅक्स : 0712 – 2561588
ई–मेल : nmcnagpur@gmail.com
कार्यालय : महानगरपालिका मार्ग, सिव्हिल लाईन्स, नागपूर–440001

दिनांकः– 3।3।18

क्र. 271 /एम.सी.।2018

प्रति,

उप.संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय
उद्योग भवन 6 वा माळा
सिव्हिल लाईन नागपूर 440001

विषयः–उद्योग तथा तत्सम व्यवसायांचे परवाना/नुतनीकरण करते वेळेस त्या व्यावसायाच्या वापराप्रमाणे इमारतीचे बांधकामाची मंजूरी व अग्निशमन विभागाची मंजूरी असल्याची खात्री करुनच मान्यता देण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम 2006 कायदा 8 डिसेंबर 2008 पासून संपूर्ण राज्यात लागू झाला आहे. अधिनियमातील अनूसुची 1 मध्ये वर्गीकृत केलेली विविध इमारतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना आणि किमान अग्निशमन यंत्रणा याची इमारतमालक/भोगवटदार तरतूद करील आणि नेहमी या उपाययोजना दुरुस्त आणि कार्यक्षम स्थितीत ठेवतील.

तसेच शहर विकास नियंत्रण नियमावली तरतूदीतील अनु. क्र. 6.2.6.1,6.6.2 नूसार 150 स्क्वेअर मीटरपेक्षा जास्त व्यवसायीक इमारतीचे बांधकाम असलेले व 15 मीटर पेक्षा जास्त बांधकाम असलेल्या इमारतींना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम 2006 नूसार आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना आणि किमान अग्निशमन यंत्रणाचे उपाययोजना करणे बंधनकारक आहे.

आपले संचालनालयातर्फे वेगवेगळया उद्योगाच्या व्यवसायाकरीता परवाने/नुतनीकरण निर्गमीत केले जातात. अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे अग्नि सुरक्षा उपाययोजना व अग्निशमन यंत्रणा उभारण्या संबंधात अग्निशमन विभागाकडे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यास अर्ज प्राप्त होत असतात.

अश्या वेगवेगळया व्यवसायीक वापराचे इमारतींना ना हरकत प्रमाणपत्राची प्रकरणे हाताळतांना अथवा इमारतीचे निरीक्षण करते वेळेस विभागाला असे निदर्शनास आले आहे की, इमारतीला किंवा इमारतीच्या भागाला वापराप्रमाणे सक्षम प्राधिकरणाची बांधकाम मंजूरी नसतांना तसेच त्याच वापराकरीता अग्निशमन विभागाची परवानगी नसतांना आपले विभागाद्वारे परवाने/नुतनीकरण निर्गमीत केले जातात

त्यामूळे अधिनियमातील तरतूदी अंतर्गत त्या व्यवसाया करीता विनिर्दिष्ट केलेल्या आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना आणि किमान अग्निशमन यंत्रणा नसल्याने कायद्याचे उल्लंघन सुध्दा होत आहे. **उदा.** इमारतीचे सामासिक अंतर, उंची, वाहनतळ, पळण्याकरीता सुरक्षीत मार्गाची रुंदी, अग्निशमन कार्याकरीता पाण्याचा साठा किंवा टाकी इत्यादी प्रकारच्या अडचणी येत असतात. त्यामुळे अश्याप्रकारच्या इमारतीत आगीची दुर्घटना झाल्यास जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करीता व्यवसायाच्या वापराप्रमाणे इमारतीचे बांधकामाला सक्षम प्राधिकरणाची व अग्निशमन विभागाची मंजूरी असल्याची खात्री केल्यावरच त्या व्यवसायांचे परवाना /नुतनीकरणास मान्यता दयावी ही विनंती.

आयुक्त,<br>
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

# कार्यालय, नागपूर महानगरपालिका नागपूर

३१/१०/२०२३ पर्यंत अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातर्फे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेल्या विविध प्रकारच्या इमारतीवर अधिनियमा अंतर्गत केलेल्या कार्यवाहीसंबंधी विवरण

| अ.क्र. | इमारतीचा प्रकार | प्रथम नाहरकत प्रमाणपत्र क्रमांक / संख्या | बांधकाम/निर्माणाधिन असलेल्या इमारतींची संख्या | अंतीम नाहरकत प्रमाणपत्र क्रमांक /संख्या | कलम ६ पर्यंत कार्यवाही केलेले प्रकरणाची संख्या | कलम ८(१) पर्यंत कार्यवाही केलेले प्रकरणाची संख्या | कलम ८(२) क पर्यंत कार्यवाही केलेले प्रकरणाची संख्या | कलम ८(२) ख पर्यंत कार्यवाही केलेले प्रकरणाची संख्या | कलम ८(३) पर्यंत कार्यवाही केलेले प्रकरणाची संख्या | कलम ४० अंतरगत कार्यवाही | कलम ३६ पर्यंत कार्यवाही केलेले प्रकरणाची संख्या | कलम ६ नुसार आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनांची पुर्तता केलेल्या प्रकरणांची संख्या | एकुण कार्यवाही करण्याबाबत शिल्लक असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | रहीवासी इमारत | १४९६ | ३१७ | ३९४ | ३१६ | २५० | १५३ | ७३ | ७ | ० | ८ | ३९ | ४७८ |
| २ | शैक्षणिक इमारत | ३६७ | ५८ | ७० | १२३ | ८३ | ४९ | ८ | ० | २ | ० | ४३ | १२१ |
| ३ | हॉस्पीटल इमारत | ४९५ | ७४ | ८७ | १८१ | ११९ | ३५ | २ | ० | ० | ० | ४० | १५६ |
| ४ | असेम्ब्ली इमारत | ८५४ | ६९ | ५५ | ३६२ | २३४ | १५३ | १२ | २ | १ | ७ | ११३ | ३५४ |
| ५ | बिझनेस इमारत | २४० | ४१ | ४८ | ३७ | ३२ | १९ | २ | ० | ० | १ | १४ | १२१ |
| ६ | मर्कनटाईल इमारत | ५१० | ७२ | ८८ | १६५ | १३६ | ८८ | १३ | २ | ० | २३ | ३४ | १११ |
| ७ | इंडस्ट्रीयल इमारत | ६६५ | ४२ | ६७ | ३४० | २३३ | २१९ | ४८ | ६० | २ | ६३ | २८ | २३४ |
| ८ | स्टोरेज इमारत | ३५ | २ | ३ | ११ | ६ | २ | ० | ० | ० | ० | ३ | ५ |
| ९ | हर्जाडस इमारत | ३८१ | ३१ | २१ | ९३ | ३१ | ३ | ० | ० | ० | ३ | ११ | २३३ |
| १० | मिश्र भोगवटा | २९९ | ३७ | ३१ | १५० | ११२ | ७३ | ४ | १ | ० | १० | ७६ | ८७ |
| ११ | रहीवासी हॉटेल व हॉस्टेल | २५३ | २९ | ३९ | ७० | ५० | २७ | ० | ० | ० | ७ | १०१ | ९४ |
| | एकुण | ५५९५ | ७७२ | ९०३ | १८४८ | १२८६ | ८२१ | १६२ | ७२ | ५ | १२२ | ५८२ | २०७४ |